# मुंबई  विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक- २० ऑक्टोबर २०१५

## शाहीर अमरशेख यांच्या कला महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पोहचविल्या जाणार – मा. मंत्री विनोद तावडे

## लोककलांना लोकाश्रय मिळणे गरजेचे – मा.मंत्री विनोद तावडे

## शाहीर अमरशेखांवरील माहितीपटासाठी सर्वोत्तोपरी मदत केली जाणार - मा.राज्यमंत्री रविंद्र वायकर

## शाहीर अमरशेख जन्मशताब्दी उदघाटन सोहळ्याप्रसंगी अमरशेख यांच्या तैलचित्राचे अनावरण

मुंबई- साहित्य आणि कलांमध्ये समाजमन बदलण्याची मोठी ताकद असून शाहीर अमरशेख यांच्या कला या जन्मशताब्दी वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पोहचविल्या जाणार असल्याचे प्रतिपादन मा.उच्च व तंत्रशिक्षण व सांसकृतिक कार्य मंत्री  विनोद तावडे यांनी आज मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या शाहीर अमरशेख जन्मशताब्दी उदघाटन सोहळ्याच्या प्रसंगी व्यक्त केले.मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमी व शाहिर अमरशेख अध्यासन केंद्राच्या वतीने दिक्षान्त सभागृहामध्ये शाहीर अमरशेख जन्मशताब्दी उदघाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.पुढे ते म्हणाले, समृध्द परंपरेने नटलेल्या महाराष्ट्राच्या लोककलांना लोकाश्रय मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पूर्णपणे सहकार्य मिळणार असून या लोककला आणि लोकसंस्कृती सातासमुद्रापार पोहचणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रातील संस्कृती ही एक सधन व संपन्न संस्कृती आहे.या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग हा महाराष्ट्रातील लोककला आणि लोकसंस्कृती आहेत.या लोककला सातासमुद्रापार पोहचण्यासाठी लोककलांनी भौगोलिक सीमारेषा ओलांडणे गरजेचे असुन,या लोककलांचे जतन करणे ही काळाची गरज आहे.जगभरात लोककलांना अनन्यसाधारण महत्व आहे.सांस्कृतिक ठेवा जतन करुन पुढच्या पीढीपर्यंत या लोककला पोहचविण्याचे महत्वाकांक्षी कार्य या स्तरातून करणे गरजेचे आहे.भावी पीढीला या लोककलांची आठवण आणि त्यांच्यात स्फुर्ती व प्रेरणा जागविण्यासाठी या लोककलांचे डिजीटायटेझन करणेही काळाची गरज होऊन बसली आहे.त्यासाठी या लोककला सर्वसामान्य पर्यंत पोहचविण्यासाठी तसेच त्यांची ख्याती सर्वदूर पसरविण्यासाठी या लोककला चार भींतीच्या आत न ठेवता त्यांचे प्रात्याक्षिकीकरण सर्वत्र व्हायला पाहिजे असेही प्रतिपादन त्यांनी केले.पुढे ते म्हणाले की,या जागतिकिकरण्याच्या रेट्यात या लोककला लोप पावणार नाही याची काळजी सर्वांनाच घ्यावी लागणार आहे.याप्रसंगी शाहीर अमरशेख यांच्या, जगप्रसिध्द चित्रकार वासुदेव कामत यांनी रेखाटलेल्या तैलचित्राचे अनावरण करणे हे माझ्यासाठी गौरवाचा क्षण असल्याचेही त्यांनी सांगितले.

तर राज्याचे मा.उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी शाहीर अमरशेख यांच्या आठवणींना उजाळा दिला.सयुंक्त महाराष्ट्र चळवळीतील शाहीर अमरशेख यांचे योगदान हे खुप मोठे असून सयुंक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाहीर अमरशेख हे आघाडीवर होते.महाराष्ट्रातील व पर्यायाने भारतातील लोककलांचे जतन ,संवर्धन व संशोधन करणा-या मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे त्यांनी अभिनंदन केले असून त्यांना या कामी शुभेच्छा दिल्या.

लोकांना एकत्र ठेवण्यासाठी कला महत्वाची असून तीची जोपासणा व्हायला हवी असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु व राज्यसभा सदस्य डॉ.भालचंद्र मुणगेकर यांनी केले.आपल्या कारकिर्दीमध्ये सुरु करण्यात आलेल्या या लोककला अकादमीमुळे मला पुन्हा याठिकाणी या लोककलांची महती विशद करतांना विशेष आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले.

तर लोककलांचे महत्व व त्यांची समाजमनातील व्याप्ती यांचे ही फार मोठी असून पुढच्या पीढीला त्याचे शिक्षण मिळत राहणे हे अत्यंत महत्वाचे असून त्या दृष्टिकोनातून सर्वानाच प्रयत्नशील राहावे लागेल असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांनी केले. शाहीर अमरशेख यांचे तैलचित्र रेखाटन हे माझ्यासाठी सौभाग्य असून मला विद्यापीठाने ही संधी दिली त्याबद्दल मी आभार व्यक्त करीत असल्याचे चित्रकार वासुदेव कामत यांनी सांगितले.

तर सकाळच्या सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या ***“शाहीर अमरशेख :व्यक्ती –वाङ्मय-विचार”*** या परीसंवादाच्या उदघाटनाप्रसंगी राज्यमंत्री,उच्च व तंत्रशिक्षण ,रविंद्र वायकर म्हणाले की, शाहिर अमरशेख यांचे कार्य पुढील पिढीपर्यंत नेण्यासाठी एक माहिती पट तयार करावा त्यासाठी शासनाकडून योग्य ती भरघोस आर्थिक मदत करण्यात येईल. एवढेच नव्हे तर यासाठी वैयक्तिक आर्थिक मदत करण्याचे आश्वासनही वायकर यांनी यावेळी दिले. लोककला अकादमीकडून शाहिर अमशेख यांच्यावर जी चित्र फित तयार करण्यात आली आहे. ती चित्र फित शिवाजीपार्क येथे तयार करण्यात आलेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दालनात ठेवण्यात यावी , अशी सुचनाही त्यांनी लोककला अकादमीच्या संचालकांना केली. महाराष्ट्राची लोककला सातासमुद्रापार नेणार्याच मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीतून शिक्षण घेऊन बाहेर पडणार्याच विद्यार्थ्यांसाठी ‘नॅशनल स्कुल ऑ फ ड्रामा ’च्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाने व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

दशकपूर्ती झालेल्या लोककला अकादमीने अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली असुन या विभागामार्फत केले जाणारे उपक्रम हे कायमच स्तूत्य असल्याचे प्रतिपादन कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी केले. आजच्या दिवशी ऐतिहासिक स्मृतीना उजाळा देत, शाहीर अमरशेख यांनी समाजात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन सयुंक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचे योगदान व कलापथकांच्या माध्यमातून शाहीरांनी केलेले प्रबोधन हे अत्यंत स्फुर्तीदायक आणि प्रेरणास्त्रोत म्हणून आजही त्याकडे पाहिले जाते.मुंबई विद्यापीठाच्या शाहीर अमरशेख अध्यासन केंद्राच्या वतीने शाहीर अमरशेख यांचे कार्य व त्यांच्या साहित्याची व्याप्ती सर्वदुर पसरवून हे अध्यासन केंद्र उंची गाठेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रप्रेम हेच शाहीर अमरशेख यांचे पिंड असून त्यांच्या शब्द आणि स्वरामध्ये अजोड ताकद होती,शाहीरांच्या विचारांचे आदान- प्रदान होणे ही काळाची गरज असून शाहीरांच्या विचारातून नवीन पीढी तयार करणे हेही तितकेच महत्वाचे असल्याचा सुर परिसंवादामध्ये उमटला.या परिसंवादामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डॉ.माधवराव पोतदार,मधुकर नेराळे,प्रकाश रेड्डी, डॉ.अजीज नदाफ आणि डॉ.क्रांती जेजुरकर यांची उपस्थिती लाभली होती.तर आजच्या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष

प्रा.डॉ.सदानंद मोरे हे होते.तर कार्यक्रमाला ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक कमलाकर सोनटक्के आदीसंह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषण प्रा.डॉ.प्रकाश खांडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ.एम.ए. खान यांनी केले.तर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विभागप्रमुख डॉ.गणेश चंदनशिवे आणि समन्वयक प्रा.मोनिका ठक्कर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता शाहीरी फुलोरा यांनी झाली,यामध्ये शाहीर देवानंद माळी,शाहीर केशर जैनु चांद,निशांत जैनु चांद,डॉ.अजीज नदाफ आणि आलम रमजान बागणीकर यांनी त्यांच्या शाहीरीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)